
खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : २६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०९ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नवी मुंबई विमानतळाजवळ महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०८, पनवेल (नवी मुंबई) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर रात्रीच्या सुमारास महिला प्रवाशाच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याची घटना समोर आली आहे. रात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास ओला कॅब चालकाने सुनसान रस्त्यावर वाहन थांबवून महिला प्रवाशासोबत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला रात्रीच्या १ ते २ च्या वेळेस कॅबमधून प्रवास करत होती. विमानतळ परिसराच्या जवळ आल्यानंतर चालकाने कॅब एका सुनसान ठिकाणी थांबवल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर चालकाने महिलेची छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे महिला प्रवाशामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

विमानतळ परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर प्रवाशांची ये-जा सुरू असताना अशा प्रकारची घटना घडल्याने महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः विमानतळाच्या आसपासच्या रस्त्यांवर रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशव्यवस्था, पोलिसांची गस्त आणि सुरक्षेची प्रभावी यंत्रणा आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, या घटनेबाबत संबंधित महिला किंवा पोलिसांकडून अधिकृत माहिती उपलब्ध झाल्यानंतरच घटनेचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधित चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विमानतळ परिसरातील कॅबसेवा, चालकांची पडताळणी, रात्रीची पोलिस गस्त आणि सुनसान मार्गांवरील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज या घटनेच्या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.

## पनवेलमध्ये बेजबाबदार रिक्षाचालकांवर वाहतूक विभागाचा दणका




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०८, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध आणि सुरक्षित करण्याच्या उद्देशाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या रिक्षाचालकांच्या विरोधात पनवेल शहर वाहतूक शाखा आणि प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने संयुक्त विशेष रिक्षा कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल १६५ रिक्षांवर कारवाई करण्यात आली असून, संबंधितांकडून १ लाख ४४ हजार ३५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पनवेल रेल्वे स्थानक आणि उरण नाका या प्रमुख वर्दळीच्या ठिकाणी ही विशेष मोहीम राबविण्यात आली. रिक्षामध्ये अनधिकृतपणे फ्रंट सीट बसविणे, चालकाने गणवेश परिधान न करणे, मीटरप्रमाणे रिक्षा न चालविणे तसेच इतर विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली.

पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, पनवेल शहर वाहतूक शाखा तसेच श्री. अनिल गेळे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली ही संयुक्त विशेष मोहीम राबविण्यात आली.

पनवेल शहरात रिक्षा प्रवास करणाऱ्या नागरिकांकडून मीटरप्रमाणे भाडे न आकारण्याच्या तक्रारी सातत्याने केल्या जातात. अनेक वेळा प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यासाठी रिक्षाचालकांकडून मनमानी भाडे सांगितले जाते. त्यामुळे प्रवासी आणि रिक्षाचालक यांच्यात वाद निर्माण होण्याचे प्रकारही घडतात. याशिवाय काही रिक्षाचालक प्रवाशांशी उद्धटपणे किंवा मुजोरीच्या भाषेत बोलत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर वाहतूक विभागाचा वचक असणे आवश्यक असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, या कारवाईबाबत काही रिक्षाचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. कुठलाही मोठा सण किंवा उत्सव जवळ आला की अचानक रिक्षांवर कारवाई सुरू होते. वर्षभर नियमांची अंमलबजावणी सातत्याने होत नाही आणि सणांच्या काळातच मोठ्या प्रमाणावर कारवाई केली जाते, अशी प्रतिक्रिया काही रिक्षाचालकांनी व्यक्त केली.

दुसरीकडे 'तात्पुरती भीती नको, कायमचा वचक हवा' - प्रवासी, रिक्षाचालकांच्या मनमानीला आळा घालण्यासाठी अशा कारवाया नियमितपणे होणे गरजेचे असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. कारवाई झाल्यानंतर काही दिवस रिक्षाचालक नियमांचे पालन करतात; मात्र काही काळानंतर पुन्हा पूर्वीसारखी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे तीन ते सहा महिन्यांतून एकदा कारवाई करून उपयोग होणार नाही. महिन्यातून किमान दोन ते तीन वेळा अशा विशेष कारवाया झाल्या, तरच नियमभंग करणाऱ्या रिक्षाचालकांवर कायमस्वरूपी वचक निर्माण होईल, अशी प्रतिक्रिया काही प्रवाशांनी दिली. प्रवाशांच्या मते, केवळ दंड आकारणे हा उपाय नसून मीटरप्रमाणे भाडे आकारले जाते की नाही, चालक गणवेशात आहे की नाही, वाहनामध्ये अनधिकृत बदल केले आहेत का आणि प्रवाशांशी योग्य वर्तन केले जाते का, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे.

पनवेल रेल्वे स्थानक, उरण नाका, बसस्थानक, बाजारपेठा आणि शहरातील प्रमुख चौकांमध्ये रिक्षांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी नियमित वाहतूक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत प्रवास मिळावा यासाठी रिक्षाचालकांनी वाहतुकीचे सर्व नियम पाळणे गरजेचे आहे. गणवेश परिधान करणे, मीटरप्रमाणे रिक्षा चालविणे, नियमानुसार भाडे आकारणे आणि प्रवाशांशी सौजन्याने वागणे ही रिक्षाचालकांची जबाबदारी असल्याचे वाहतूक विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, पनवेल शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी विविध ठिकाणी यापुढेही अशाच प्रकारच्या विशेष कारवाया सुरू ठेवण्यात येणार असल्याचे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, या कारवाया केवळ सण-उत्सव किंवा विशेष मोहिमेपुरत्या मर्यादित न राहता नियमित आणि सातत्यपूर्ण स्वरूपात व्हाव्यात, अशी अपेक्षा प्रवासी आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# राष्ट्रवादीचं विलीनीकरण अन् काँग्रेस प्रवेशाची चर्चा;
# रोहित पवारांनी मांडली रोखठोक भूमिका





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, नागपूर :** भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असली, तरी प्रत्यक्षात अशी कोणतीही चर्चा सुरू नसल्याचे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले. उलट राष्ट्रवादी काँग्रेसची सध्याची राजकीय स्थिती पाहता, महायुतीतील मित्रपक्ष म्हणूनही त्यांना अपेक्षित सन्मान मिळत नसल्याचा टोला त्यांनी लगावला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अर्थ खात्याच्या मागणीवरून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठका झाल्या, तरीही अजित पवारांकडे हक्काने असलेले अर्थ खाते भाजपने त्यांच्याकडेच ठेवले असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला.

भाजप - राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चेबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले, असं काही झालेलं नाही, कुठेच काही झालेलं नाही. हे केवळ चर्चा आहे. किती वेळ आपण चर्चा करायची, असाही मुद्दा आहे. त्यामुळे कुठेही विलीनीकरणाची चर्चा सुरू नाही. आज त्या पक्षाची स्थिती काय आहे? त्यांचं अर्थ खातं त्यांना मिळावं यासाठी अमित शहा आणि मुख्यमंत्र्यांसोबत बैठका झाल्या. पण तरीसुद्धा दादांकडे हक्काने असलेलं अर्थ खातं भाजप अजूनही त्यांना देत नाही. त्यामुळे त्यांचाच मित्रपक्षांसोबत चालत नाही, तसेच जर लोकांची भूमिका सत्ताधाऱ्यांच्या विरोधात असेल, तर आम्ही सरकारच्या विरोधात बोलायला लोकांसोबत खुश आहोत, असे रोहित पवार म्हणाले.

यावेळी सोमेश्वर कारखाना निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन करत रोहित पवार म्हणाले की, अजितदादांच्या निधनाला अद्याप एक वर्षही पूर्ण झालेले नसताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली चांगल्या पद्धतीने चाललेल्या कारखान्याची निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न सर्व पक्षांनी करावा. केवळ सोमेश्वरच नाही, तर इतरही सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुकांमध्ये असाच विचार करायला हवा.

त्यांच्याकडचे काही चांगले संचालक आणि आमच्याकडचे काही चांगले संचालक एकत्र येऊन निवडणूक बिनविरोध झाली तर चांगलंच आहे. भाजप आणि शिंदे साहेबांचे काही लोक यात लक्ष घालायला लागले असल्याचं आम्हाला कळलं आहे. ही निवडणूक बिनविरोध झाली तर ती अजितदादांना श्रद्धांजली ठरेल, असे रोहित पवार म्हणाले.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे आणि सरकारमध्ये चर्चा सुरू असल्याचे सांगत रोहित पवार यांनी हा संवाद सुरू असताना इतरांनी त्यावर राजकीय टिप्पणी करण्याची गरज नसल्याचे सांगितले.

हे एक सामाजिक आंदोलन आहे. ते स्वतः सामाजिक कार्यकर्ते आहेत, आरोग्याची काळजी त्यांनी घेतली पाहिजे अशी माझी विनंती आहे. मुख्यमंत्री आणि सरकार यामध्ये चर्चा सुरू आहे त्या दोघात चर्चा सुरू असताना आम्ही बोलून काय होणार? मराठा आरक्षण असेल, धनगर आरक्षण असेल, विविध समाजाचे आरक्षणाचे प्रश्न सोडवायचे असेल तर त्यात घटनादुरुस्ती करावा लागेल, सर्वपक्षीय खासदारांनी एकत्र दिल्लीत बसून हा मुद्दा मांडला तर कोर्टात टिकणारं आरक्षण हे मराठा समाजाला आणि धनगर समाजाला मिळू शकते, हा जो संवाद सुरू आहे आता जरांगे आणि सरकार यांच्यात चाललेला आहे, अशी भूमिका रोहित पवार यांनी मांडली.

**सदावर्ते गाढविणीचं दूध पितात, म्हणून त्यांचा डोक्यावर परिणाम झाला**

मनोज जरांगे पाटील हे शरद पवार यांच्या इशाऱ्यावर बोलतात, अशी टीका ॲडव्होकेट गुणरत्न सदावर्ते यांनी केली होती. या टीकेला आमदार रोहित पवार यांनी जोरदार प्रत्युत्तर देत सदावर्ते यांच्यावर बोचरी टीका केली. ते म्हणाले, जो व्यक्ती नवीन नवीन कपडे घालतो, वेगवेगळ्या रंगांचे गॉगल वापरतो, आपण सर्वजण गाईचं किंवा म्हशीचं दूध पितो,

मात्र ते गाढविणीचं दूध पितात. गाढविणीचं दूध प्यायल्यानंतर डोक्यावर काय परिणाम होतात, हे त्यांच्याकडे पाहिल्यावर कळतं. तसेच सदावर्ते हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे असून त्यांच्यासाठी राजकीय भूमिका मांडत आहेत, असा आरोपही रोहित पवार यांनी केला. 'हे बंदूकवाले शूटर नाहीत, तर राजकीय दृष्टिकोनातून बोलणारे शूटर आहेत,' असा हल्लाबोलही रोहित पवारांनी केला आहे.

# कोल पाईप कन्व्हेअर वे प्रकल्प कमिशनिंग कामगारांचे कामबंद आंदोलन

## अल्टाटेक इंजिनिअरिंग कंपनी विरुद्ध पुकारला एल्गार



**अक्षराक : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** खापरखेडा वीज केंद्रात कोळसा वाहून नेणाऱ्या कोट्यवधींच्या प्रकल्पात कार्यरत असलेल्या कमिशनिंग कामगारांनी नियमित वेतन आणि किमान वेतन व इतर भत्त्यांच्या मागणीसाठी दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी कामबंद आंदोलन पुकारले त्यामूळे काही काळ कोळसा वाहतूक करणारी पाईप कन्व्हेअर कोल वे यंत्रणा ठप्प पडली व एकच खळबळ उडाली.

खापरखेडा व कोराडी औष्णिक वीज केंद्रात लागणारा कोळसा जवळच्या कोळसा खाणीतून आणण्यासाठी जवळपास ४५० कोटी रुपये खर्चून कोल पाईप कन्व्हेअर वे प्रकल्प उभारण्यात आला आहे. नोएडा येथील इस्जेक हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीला या प्रकल्पाचे कंत्राट देण्यात आले सध्या या प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आले असून कमिशनिंगचे काम सुरू आहे.

इस्जेक हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीने कमिशनिंगचे काम अल्टाटेक इंजिनिअरिंग या सब-कंत्राटदार कंपनीला दिले आहे. सदर कंपनीत जवळपास १६० कमिशनिंग कामगार कार्यरत आहे मात्र मागील अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात शोषण सुरू असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.

कामगार कायदा १९४८ नुसार कामगारांना किमान वेतन व इतर भत्ते नियमानुसार देणे बंधनकारक आहे. मात्र, अल्टाटेक इंजिनिअरिंग कंपनीने सर्व नियम धाब्यावर बसवून कमी पगार देऊन कमिशनिंग कामगारांची बोळवण करत आहे शिवाय नियमित वेतन खात्यावर जमा होत नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

या संदर्भात वअल्टाटेक इंजिनिअरिंग कंपनीचे साईट इंचार्ज शेखर शिवारे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे प्रस्तुत प्रतिनिधीला दिली. कमिशनिंग कामगारांच्या आंदोलनामुळे प्रकल्पाचे काम ठप्प झाल्याची माहिती मिळताच इस्जेक हेवी इंजिनिअरिंगचे संबंधित अधिकारी मनीष सिंग आंदोलन स्थळी दाखल झाले. यावेळी थकीत वेतन लवकरात लवकर बँक खात्यात जमा करण्याचे आश्वासन दिले त्यामूळे तूर्तास कामगारांनी आंदोलन मागे घेतले मात्र किमान वेतन व इतर भत्ताचा मुद्दा अजूनही कायम आहे.

## खापरखेडा वीज केंद्रातील खाजगी कंपनीच्या गोदामात चोरी

अक्षराज : दिवाकर घेर

दि.०८, नागपूर : खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात असलेल्या एका खाजगी कंपनीच्या गोदामाचे टिनाचे छत कापून अज्ञात चोरट्याने सुमारे २ लाख ३६ हजार रुपये किमतीचे तांब्याचे साहित्य लांबवल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. याप्रकरणी खापरखेडा पोलिसानी दोन चोरट्यांना ७ सप्टेंबरला रात्री उशिरा ताब्यात घेऊन अटक केली असून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पुनीत राजू भगत(२५), श्रीकांत बंडू गजभिये (२५) दोघेही जयभोले नगर खापरखेडा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार इस्जेक हेवी इंजिनिअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात फ्लूयू गॅस डिसल्फ्यूराझेशन (एफजीडी ऋ्भ्रृ) प्रकल्पाचे कोठ्यावधी रुपयांचे काम मिळाले आहे सद्या सदर कंपनीचे इरेक्शन व कमिशनिंगचे सुरू आहे.

सदर कंपनीला लागणारे साहित्य ठेवण्याकरिता वीज केंद्र युनिट क्रमांक ३ व ४ परिसरात गोदाम बनविण्यात आले आहे. १२ ऑगस्ट रोजी इस्जेक हेवी इंजिनिअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ अभियंता सुरज ठाकूर (३२), बोकारा, नागपूर व साईड इंचार्ज दीपक मंडल महाजेनकोला देण्यासाठी कॉपर वायर व प्लेट्स काढण्यास गोदामात गेले असता त्यांना गोदामाचे छताचे टिन कापलेले आढळून आहे.

गोदामातील साहित्याची पाहणी केली असता १६ एम.एम. कॉपर वायर ३२० मीटर अंदाजे किंमत ९० हजार रुपये, कॉपर प्लेट्स १४ नग अंदाजे १ लाख ३० तीस हजार रुपये कॉपर बॉल ८ नग अंदाजे किंमत १६ हजार रुपये असा एकूण २ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

सदर घटनेत विशेष म्हणजे जवळपास एका महिन्यानंतर ७ सप्टेंबर सोमवारला वरिष्ठ अभियंता सुरज ठाकूर यांनी खापरखेडा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. लाखो रुपयांचे साहित्य लंपास झाले मात्र एका महिन्यानंतर पोलिसात तक्रार झाल्या मूळे कुठंतरी पाणी मुरत असल्याचे दिसून येते.

खापरखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी पुनीत भगत, श्रीकांत गजभिये याला ताब्यात घेऊन अटक केली असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. सदरची कार्यवाही वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या सपोनि सचिन यादव, पोहवा संदीप सगने, बादल गिरी, आशिष मेश्राम,व शेखर वानखेडे, आशिष कापसे पथकाने पार पडली असून पुढील तपास सुरू आहे.




## बैलपोळा

भारतीय संस्कृती ही पुरातन संस्कृती आहे.त्याचप्रमाणे भारत कृषीप्रधान देश आहे.त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही केली जातात.त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो. कारण पुर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची.श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजाअर्चना करून साजरा करतात.या सणाला पिठोरी अमावस्या,मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात.या दिवशी संपूर्ण शेतकरी बांधवांचा परिवार बैलांच्या सेवेत मग्न असतात.बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात.त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो.या सणाची सुरूवात बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते.बैलपोळ्याच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो. त्याच दिवशी म्हणजे बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात.कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात.म्हणुनच म्हणतात कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा या उद्देशाने शेतकऱ्यांना बैलांपासुन काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात.तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते.कारण वर्षभर नांगर,वखर,बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षेभर शेतात राबराब राबतात. परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात.त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात.खांदशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात आज आवतन घ्या उद्या जेवायला या ज्याप्रमाणे लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद लावून दुसऱ्या दिवशी सजवून बैलपोळ्याच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पध्दतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवुन वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळ्याच्या ठिकाणी एकत्र आणले जाते व प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देतात.या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णतः सुट्टी असते.जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळ्याच्या दिवशीच विश्रांती मिळते. यानंतर दुसऱ्याचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी बैलांचे महत्त्व लहान मुलांना समजावे या उद्देशाने लाकडाचे बैल सजवुन पोळ्यामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळ्यांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो.अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासुन तर बालगोपालांपर्यंत सर्वत्र बैलपोळ्याचा व तान्ह्या पोळ्याचा आनंद घेतांना दिसतात.अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते.त्यामुळे यात सर्वच मोठ्या उत्साहाने सहभागी होतात.जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळ्यात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो.अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबणाऱ्या व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतकऱ्यांचा खरा सोबती,सखा जिवलग मित्र म्हणजे बैल.त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे.शेतकरी आपल्या पध्दतीने कष्ट करून शेती पिकवितात व संपूर्ण शेत हिरवागार गालिचाच्या रूपात आपल्याला दिसुन येते.त्यामुळे सर्वसामान्यांना, सामाजिक संस्थांना व सरकारला विनंती आहे की पोळ्याचे औचित्य साधून वृक्षारोपण केले पाहिजे.कारण देशातील बदलते हवामान व वाढता अलनिनोचा प्रभाव आणि २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमधील महाभयानक नैसर्गिक आपदांमुळे झालेली जिवीत हाणी लक्षात घेता वृक्षलागवड करून निसर्गाला वाचविने आपले प्रथम कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ यांचा नेहमीच सामना करावा लागतो आणि आता सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक भाग जलमग्न झाले आहे आणि अनेक शेतकऱ्यांची पीके पाण्याखाली आल्याने अत्यंत चिंतेत आहे व सध्याच्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे यात वित्तीय हानी व मानवीय हानी सुध्दा झाली आहे किंवा होत आहे.अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना निसर्गापासुन ताबडतोब दिलासा मिळावा हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.त्याच प्रमाणे देशात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भूकंप,ग्लेशियर वितळने,भुस्कखलन,ढगफुटी, ज्वालामुखीचा उद्रेक,नद्यांना महापुर इत्यादी भयावह घटना बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत.यामुळे राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय हानी होत आहे .त्यावर फुंकर घालण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व गुरांना चारा मिळेल,सर्वांना शुध्द हवा मिळेल, ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मदत होईल व सृष्टी प्रफुल्लित राहील.बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय जवान जय किसान!जय हिंद.

**– रमेश लांजेवार**

# गोकुळाष्टमी : कृष्णजन्माचा उत्सव

श्रावण संपत येतो आणि भाद्रपदाची चाहूल लागते, तेव्हा वातावरणात भक्तीचा सुगंध दरवळू लागतो. मंदिरांमध्ये सजावट होते, घराघरांत कृष्णजन्माची तयारी सुरू होते, गोकुळातील नंदलालाच्या बालरूपाचे स्मरण केले जाते आणि मध्यरात्री 'नंद के घर आनंद भयो'चा जयघोष घुमतो. गोकुळाष्टमी म्हणजे केवळ भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव नाही, तर तो अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा, प्रेमाला प्रतिष्ठा देण्याचा आणि जीवनात कर्तव्याला सर्वोच्च स्थान देण्याचा संदेश देणारा दिवस आहे. आज कृष्णाची पूजा मोठ्या भक्तिभावाने होते, पण कृष्णाने दिलेल्या विचारांची पूजा आपण किती करतो? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली. कंसाच्या अत्याचाराने मथुरा भयभीत झाली होती. सत्तेच्या मदाने उन्मत्त झालेल्या कंसाने आपल्या बहिणीच्या पोटी जन्मणारा आठवा पुत्र आपला अंत करेल, या भीतीने देवकी-वसुदेवांना कारागृहात डांबले. अशा अत्याचाराच्या अंधारात श्रीकृष्णाचा जन्म झाला. कृष्णाचा जन्मकाळ हा मध्यरात्रीचा, अंधाराचा. पण त्याच अंधारातून प्रकाश जन्माला आला. या कथेत आजच्या समाजासाठी मोठा संदेश दडलेला आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी आशेचा दिवा विझता कामा नये.

आजही समाजात अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, अंधश्रद्धा, शोषण आणि असमानतेचे अनेक 'कंस' आहेत. त्यांच्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी प्रत्येकाच्या मनातला कृष्ण जागा झाला पाहिजे. आपण कृष्णाचे चित्र डोळ्यासमोर आणतो तेव्हा हातात बासरी, डोक्यावर मोरपीस, चेहऱ्यावर हास्य आणि भोवती गोकुळातील गायी, असे सुंदर रूप दिसते. पण कृष्णाचे व्यक्तिमत्त्व एवढ्यापुरते मर्यादित नाही. कृष्ण हा प्रेमाचा संदेश देणारा, अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारा, मैत्री जपणारा, संकटात मार्ग दाखवणारा आणि योग्य वेळी कठोर निर्णय घेणारा नेतृत्वकर्ता होता. त्याच्या जीवनात बाललीला होती, तर त्याच जीवनात कर्तव्याची कठोर परीक्षा देखील होती. म्हणूनच कृष्ण समजून घेणे म्हणजे केवळ त्याची आरती करणे नव्हे, तर त्याच्या विचारांचा आपल्या आचरणात स्वीकार करणे होय. कृष्णाच्या जीवनातील गोवर्धन पर्वताची कथा आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात विशेष अर्थपूर्ण वाटते. निसर्गाशी माणसाचे नाते काय असावे, याचा संदेश या कथेतून घेतला जाऊ शकतो.

आज विकासाच्या नावाखाली जंगलतोड होते, नद्या प्रदूषित होतात, जलस्रोत बुजविले जातात आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो.



हवामानबदलाचे परिणाम जगभर जाणवत आहेत. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाची पूजा करताना निसर्गाची पूजा करण्याचा संकल्पही केला पाहिजे. कृष्णाला आवडणारी गोकुळाची हिरवाई आपण नष्ट करत असू, तर केवळ देव्हाऱ्यातील कृष्णाला फुले वाहून काय उपयोग?



**– प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

कृष्णाच्या बाललीला हा गोकुळाष्टमीचा सर्वांत आनंददायी भाग. लोणी चोरणारा कान्हा, गोप-गोपिकांबरोबर खेळणारा कृष्ण आणि यशोदेच्या प्रेमात वाढणारा नंदलाल, हे रूप प्रत्येकाच्या मनाला भावते. परंतु या बाललीलांमध्ये जीवनातील साधेपणाचा सुंदर संदेशही आहे. आज बालपणावर स्पर्धेचे, अपेक्षांचे आणि तंत्रज्ञानाचे ओझे वाढत आहे. मुलांच्या हातातील मातीचे खेळणे कमी झाले आणि मोबाईलचा पडदा वाढला. त्यांना खेळू द्या, प्रश्न विचारू द्या, चुका करू द्या, निसर्गाशी जोडू द्या. कृष्णाच्या बाललीलांचे स्मरण म्हणजे बालमनातील निरागसतेचा सन्मान करणेही होय.

गोकुळाष्टमी म्हटले की दहीहंडीचा उत्साह अपरिहार्य. उंचावर बांधलेली हंडी फोडण्यासाठी तरुणांची मानवी मनोरे रचले जातात. एखादा पडतो, दुसरा त्याला आधार देतो; एखाद्याचा हात सुटतो, तर दुसरा हात पुढे करतो. ही केवळ करमणूक नाही. दहीहंडी आपल्याला सांगते, एकटा माणूस कितीही ताकदवान असला तरी सामूहिक शक्तीपुढे त्याची ताकद मर्यादित असते. आज समाजात जात, धर्म, भाषा, पक्ष, विचारधारा आणि आर्थिक स्तर यांच्या आधारावर भिंती उभ्या राहत आहेत. अशा वेळी दहीहंडीचा खरा संदेश समजून घेण्याची गरज आहे. एकमेकांना खाली खेचण्यात नव्हे, तर एकमेकांना वर उचलण्यात समाजाचे खरे सामर्थ्य आहे. कृष्णाचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे भगवद्गीतेचा संदेश. युद्धभूमीवर संभ्रमात पडलेल्या अर्जुनाला कृष्णाने कर्तव्याची जाणीव करून दिली. आजचा माणूसही अनेक प्रश्नांनी घेरलेला आहे. करिअरची चिंता, आर्थिक ताण, नात्यांमधील दुरावा, स्पर्धा, अपयशाची भीती आणि भविष्याची अनिश्चितता यामुळे मानसिक अस्वस्थता वाढत आहे. अशा वेळी गीतेचा कर्मयोग आपल्याला सांगतो, परिस्थितीपासून पळून जाऊ नका, कर्तव्याला सामोरे जा. कर्म करणे आवश्यक आहे, मात्र त्या कर्मामागे प्रामाणिकपणा, विवेक आणि समाजहिताची भावना असली पाहिजे. आज धर्माच्या नावावर समाजात तणाव निर्माण होताना दिसतो. सोशल मीडियावर अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि एकमेकांविरोधात विष पेरणारे शब्द सहज पसरतात. कृष्णाच्या नावाचा जयघोष करणाऱ्या समाजाने कृष्णाचा संवाद, मैत्री आणि विवेकाचा मार्ग विसरता कामा नये. कृष्णाने विविध व्यक्तींशी नाती जोडली. सुदाम्यासारख्या मित्राशी असलेली त्याची मैत्री आजही आदर्श मानली जाते. या मैत्रीत श्रीमंती-गरिबीची भिंत नव्हती. मग कृष्णभक्तीचा अर्थ आपल्या शेजाऱ्याच्या दुःखाकडे पाठ फिरवणे कसा असू शकतो? देवाला नैवेद्य दाखविण्यापूर्वी भुकेल्या माणसाच्या ताटात अन्न वाढले, तर तीच खरी भक्ती!

कृष्णाच्या कथांमध्ये राधा, रुक्मिणी, द्रौपदी आणि इतर स्त्री व्यक्तिरेखांशी संबंधित अनेक संदर्भ येतात. आजच्या समाजात महिलांच्या सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा प्रश्न गंभीर आहे. गोकुळाष्टमीच्या निमित्ताने मंदिरात दिवे लावण्याबरोबरच मुली-महिलांना सुरक्षित वातावरण देण्याचा संकल्प केला पाहिजे. स्त्रीचा सन्मान करणारा समाजच खऱ्या अर्थाने संस्कृतीचा वारसदार म्हणवून घेऊ शकतो. उत्सव हवा, पण दिखावा नको! गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरी झाली पाहिजे. मात्र उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण, प्लास्टिकचा अतिरेक, पाण्याची नासाडी किंवा धोकादायक दहीहंडी यांना प्रोत्साहन देणे योग्य नाही. उत्सव आनंदाचा असावा, पण कोणाच्या जीवावर बेतणारा नसावा. बालकृष्णाच्या जन्माचा उत्सव साजरा करताना बालकांच्या सुरक्षिततेचा विचार झाला पाहिजे. दहीहंडीमध्ये सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची काळजी घेतली पाहिजे. पर्यावरणपूरक सजावट आणि जबाबदार उत्सवाला प्राधान्य दिले पाहिजे.

कृष्ण जन्माला आला म्हणून कंसाचा अंत झाला, अशी कथा आपण ऐकतो. पण आजच्या काळातला 'कंस' एखादी व्यक्ती नसून अन्याय, भ्रष्टाचार, हिंसा, द्वेष, शोषण, व्यसन आणि असंवेदनशीलता हीच अनेक रूपे आहेत. ही वाईट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी बाहेर कुठेतरी कृष्ण शोधण्याची गरज नाही. आपल्या विवेकात, आपल्या कृतीत आणि आपल्या माणुसकीत कृष्ण जागा करावा लागेल. गोकुळाष्टमी म्हणजे देवळात गर्दी करण्याचा दिवस नाही, तर मनातील अंधार दूर करण्याचा दिवस आहे. कृष्णाची बासरी आपल्याला प्रेम शिकवो, कृष्णाचे सुदर्शन अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देवो, गीता कर्तव्याची दिशा देवो, दहीहंडी एकतेचा संदेश देवो आणि गोकुळातील निरागसता आपल्या मनात कायम राहो. कृष्णाला डोक्यावर घेण्यापेक्षा त्याचे विचार डोक्यात घेणे अधिक गरजेचे आहे. आज समाजाला आणखी एका कृष्णजन्माची वाट पाहण्याची गरज नाही. प्रत्येक घरात, प्रत्येक मनात आणि प्रत्येक कृतीत माणुसकीचा कृष्ण जन्माला आला, तरच समाजातील अन्यायाचे कंस खऱ्या अर्थाने पराभूत होतील. हीच गोकुळाष्टमीची खरी शिकवण, हीच कृष्णभक्तीची खरी दिशा आणि हीच आजच्या काळाची सर्वांत मोठी गरज! श्रीकृष्णाच्या प्रेमाचा, कर्मयोगाचा आणि माणुसकीचा संदेश आपल्या जीवनात उतरू दे. समाजात शांतता, समता, बंधुता आणि सद्भावना नांदू दे.

**सर्वांना गोकुळाष्टमीच्या**
**मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**

## डी जे छंद

कर्ण कर्कश्श डि जे
कसा असुरी आनंद
बहिरे नऐके कुणाचे
वाजत राही आक्रंद

लोकवर्गणी जमवून
झाले मंडळे स्वच्छंद
आमचाचघेऊन चंदा
चाळेचाळवेअंधाधुंद

अर्बट चर्बट गाण्यात
नाच अश्लिल बे धुंद
सद् हेतु उत्सवातला
हरवूनि गेला मकरंद

डिजेविरोधी आवाज
व्हावा डिजेहून बुलंद
कायद्याचाबडगा बसे
तेंव्हाचतोंडे होती बंद

सर्वउत्सवा समनियम
सिमा नसाव्या अरूंद
मोजमाप सर्वा सारखे
भलेअसे कुणीखाविंद

निवडणूकविजयोत्सव
जल्लोषा नाही धारबंद
पुढा-यां नसे अटकावा
का व्यक्त कराताआनंद

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# सण पोळ्याचा माणुसकी जपण्याचा !

श्रावण महिन्याच्या शेवटी पिठोरी अमावास्येला महाराष्ट्रात बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शेतकरी शेतात राबणाऱ्या बैलांच्या कष्टाची जाणीव ठेवून व बैलांना छानपैकी सजवून बैलपोळा सणाच्या दिवशी बैलांची अर्थात सर्जा राजांची मनोभावे पूजा करतात. बैलपोळा सण महाराष्ट्राच्या भुमितील एक महत्त्वाचा सण आहे. बालपणी आमच्या गावात साजरा केला जाणारा बैलपोळा सण आजही जशाच्या तसा आठवतो. हा सण शेतातील मातीची पूजा करण्याचा एक लक्षणीय उत्सव मानला जातो. या सणाच्या दिवशी ठळकपणे जपल्या जाणाऱ्या माणुसकीच्या काही आठवणी आजही ताज्या आहेत. हा सण एक विलक्षण आनंद देऊन जातो. हा सण माणुसकीला जीवापाड जपण्याचा संदेश देतो. आज घडीला शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरचा उपयोग जास्त केला जात आहे. बैलांची संख्या हळूहळू कमी होत आहे. काही वर्षांनंतर बैलपोळा सणाच्या ऐवजी ट्रॅक्टर पोळा साजरा केला जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ते काहीही असो बैलपोळा सण हा अनेक आठवणींची शिदोरी आहे. मातीशी जुळलेली नाळ कधीच न तोडण्याची शिकवण देणारा आहे.

पोळा सणाच्या आदल्या दिवशी सगळे शेतकरी बैलांची खांदेमळणी हा एक उत्सव साजरा करतात.या दिवशी बैलांना नदीच्या पात्रात किंवा तळ्याच्या पाण्यात पोहायला सोडले जाते. तेलाने बैलांच्या खांद्यांची मसाज केली जाते. बैलांचे अंग स्वच्छ धुतले जाते.शेताच्या बांधावरील हिरवे लुसलुशीत गवत बैलांना चारून व नैवेद्य खायला घालून बैलांना घरी आणले जाते. पोळा सणाच्या दिवशी बैलांना छानपैकी सजवले जाते. त्यांच्या शिंगांना आकर्षक रंग लावला जातो. संपूर्ण शरीरावर रंगीबेरंगी ठिपके काढून



व पाठीवर झूल घालून जीवाभावाच्या बैलांना सजवले जाते, नटवले जाते. दुपारपर्यंत सर्व शेतकरी आपापल्या बैलांना छानपैकी सजवतात आणि गावातील हनुमान मंदिराजवळ बैलांना उभे करतात. एका नंतर एक करत सगळे शेतकरी बांधव तेथे एकत्र येतात. गावातील लहान थोर मंडळी सजलेल्या बैलांना पाहून हरखून जातात. मग वाजतगाजत बैलांची मिरवणूक काढण्यात येते. हनुमान मंदिराभोवती बैलांना प्रदक्षिणा घालायला लावली जाते. सगळे शेतकरी आपापल्या बैलांना मंदिराभोवती फिरवतात. त्यानंतर ऐटीत आपल्या बैलांना घेऊन घराकडे जातात. प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरी बैलांना आरतीने ओवाळून पुरणपोळी खाऊ घातली जाते. माझ्या धन्याला अशीच शेवटपर्यंत साथ द्या म्हणून बैलांना साकडे घातले जाते. नारळ फोडून नारळाचा प्रसाद वाटला जातो. मग घरातील लहान थोर मंडळी एकत्र बसून पुरणपोळीचे जेवण करतात. अशाप्रकारे बैलपोळा सण साजरा केला जातो.

यावर्षी बैलपोळा सण दुष्काळाच्या सावटाखाली साजरा होतो आहे. पावसाने चांगलीच दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या पिकांची राखरांगोळी झाली आहे. आम्ही लहान होतो तेव्हा एकेवर्षी असाच दुष्काळ पडला होता. त्यावर्षी पेरणीसुद्धा झाली नव्हती. पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता. म्हणून बहुतांश शेतकऱ्यांनी त्यांची बैलजोडी विकून टाकली होती. गावातील दोन शेतकरी सोडले तर इतर कोणत्याच शेतकऱ्यांकडे बैलजोडी नव्हती. बैलपोळा सण कसा साजरा करायचा हा प्रश्न भेडसावत होता. गावातील २ मुस्लिम शेतकरी हबीब सय्यद व हाकानी शेख यांनी बैलजोडी विकली नव्हती. त्यांनी मोठ्या हिंमतीने बैलांना शेवटपर्यंत सांभाळण्याची प्रतिज्ञा केली होती. वर्षभर पुरेल इतका चारा, वैरण त्यांनी खरेदी केला होता. हबीब सय्यद व हाकानी शेख या दोघांनी त्यावर्षी बैलपोळा साजरा केला होता. गावाची परंपरा जपली होती.कितीही मोठे संकट आले तरी डगमगायचे नसते, हिंमतीने लढायचे असते हा संदेश त्यांनी दिला होता. दुष्काळाचे ते वर्ष सरले आणि पुढल्या वर्षी मुसळधार पाऊस झाला.

हबीब सय्यद व हाकानी शेख यांनी जो आदर्श निर्माण केला तो आमच्या मनात आजही कायम आहे.

कोरड्या दुष्काळाच्या काळात हबीब सय्यद व हाकानी शेख यांनी त्यांच्या बैलांना जसे जीवापाड जपले होते तसेच त्यांनी त्या बैलांना शेवटपर्यंत जपले. ते बैल म्हातारे झाल्यावर देखील त्यांनी त्या बैलांची सेवा केली होती. वेळेवर चारा पाणी दिला होता.आणि जेव्हा त्या बैलांचे निधन झाले तेव्हा मृत मनुष्यांवर जसे अंतिम संस्कार केले जातात तसे सगळे विधी करून मृत्यू पावलेल्या बैलांना शेतात खोल खड्डा करून त्यात गाढले होते. दरवर्षी पोळा सण साजरा करताना आमच्या गावातील शेतकरी बांधवांना हबीब सय्यद व हाकानी शेख यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.'सण पोळ्याचा माणुसकी जपण्याचा' हे वाक्य आजही मनात रुंजी घालत राहते...

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

# ट्रान्सफॉर्मर (डीपी) चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

### १२ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०८, लोणीकंद (पुणे) :** पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच आसपासच्या परिसरात वाढत्या ट्रान्सफॉर्मर (डी.पी.) चोरीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट ७ चे अंमलदार गस्त करीत असताना पोलीस अंमलदार विनायक साळवे यांना त्यांचे बातमीदारामार्फत गोपनीय माहिती मिळाली की, वाडेगाव ता. हवेली जि.पुणे येथे काही ट्रान्सफॉर्मर (डीपी) चोरी करणारे इसम येणार आहेत. सदरची माहिती तात्काळ पोलीस निरीक्षक श्री. वाहिद पठाण, गुन्हे शाखा युनिट ०७, पुणे शहर यांना देण्यात आली असता त्यांनी पोलीस उप-निरी. राहुल कोळपे यांना तात्काळ सदरबाबत खात्री करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेश दिले असता पोलीस उप-निरी. कोळपे व पोलीस अंमलदार यांनी बातमी प्रमाणे वाडेगाव ता. हवेली जि.पुणे येथे सापळा रचुन पाठलाग करुन एक संशयित मालवाहू टेम्पो क्र. एम.एच.१२.जी.टी.६६७५ व त्यामधील तीन इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी त्यांची नावे १) मोहम्मद साहेबजान मंगरेखान वय ३० वर्षे रा. गोटेमाळ सासवड ता. पुरंदर जि. पुणे २) आदर्श चंद्रप्रकाश पांडे वय २२ वर्षे रा. सदर ३) चंद्रसेन शिवरतन धारीया वय २८ वर्षे रा. सदर तिघेही मुळ उत्तरप्रदेश राज्य येथे राहणारे असल्याचे सांगुन त्यांनी पाठीमागील ०५ ते ०६ महिन्यांत लोणीकंद पो. स्टे. हद्दीतील वाडेगाव, आष्टापुर, सांगवी सांडस, न्हावी सांडस व हिंगणगाव येथुन एकुण ०८ डीपी / ट्रान्सफॉर्मर / रोहित्रा मधील तांब्याच्या धातुच्या तारा चोरी केल्याचे कबुल केले. याबाबत लोणीकंद पोलीस स्टेशन येथे भा.न्या सं कलम ३२४ (४) व भारतीय विद्युत अधि. कलम १३६ अन्वये दाखल असलेले एकुण ०८ गुन्हे उघडकीस आणण्यात आले असुन अंदाजे १२,७३,०००/-रु. किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींना सदर गुन्हयात दि.०६/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.

मार्गदर्शन -अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्रीमती तेजस्वी सातपुते, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) गौहर हसन, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) राजेंद्र मुळीक यांनी केले

तपास पथक - पोलीस निरीक्षक युनिट ७ पुणे शहरवाहिद पठाण यांचे सुचनांप्रमाणे पोलीस उप-निरी.राहुल कोळपे, पोलीस अंमलदार विनायक साळवे, सारंग दळे, प्रशांत कापुरे, निलेश साळवे, भरत उकिर्डे, अमोल ढोणे, विकास कदम, निर्णय लांडे, गिरीष नाणेकर, सुहास तांबेकर, किरण पलांडे, नेहा तापकीर, बाळासाहेब तनपुरे, समाधान पाटील, भरत गुंडवाड, प्रतिक्षा पानसरे, सोनाली नरवडे यांनी केली आहे.

# ओटीपीची अडचण दूर करून, प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०८, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील वृद्ध, विधवा, दिव्यांग व निराधार नागरिकांना शासनाच्या इंदिरा गांधी वृद्धापकाळ, श्रावणबाळ, इंदिरा गांधी विधवा, इंदिरा गांधी अपंग व संजय गांधी निराधार योजनांचा लाभ मिळण्यात ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे अडथळे निर्माण होत आहेत. मागील ५ ते ६ महिन्यांपासून संबंधित ऑनलाइन प्रणाली सुरळीतपणे कार्यरत नसल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहत आहेत. या समस्येची तातडीने दखल घेऊन ऑनलाइन प्रणाली सुरळीत सुरू करावी तसेच जढझ संदर्भातील अडचण दूर करावी, या मागणीसाठी सरपंच सेवा महासंघ, शिरपूर यांच्या वतीने आज शिरपूर तहसीलदार महेंद्र माळी यांना निवेदन देण्यात आले.

शिरपूर तालुक्यातील अनेक गरजू नागरिकांनी संबंधित योजनांसाठी आवश्यक अर्ज भरून त्यावर तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या करून तसेच उत्पन्नाचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे जोडून अर्जाची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. मात्र, ऑनलाइन प्रणाली बंद अथवा तांत्रिक अडचणींमुळे या पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या काही प्रमाणात ऑनलाइन अर्ज भरता येत असले तरी नवीन नियमानुसार अर्ज प्रक्रियेत जढझ आवश्यक करण्यात आले आहे. मात्र अनेक लाभार्थ्यांच्या मोबाईल क्रमांकावर जढझ प्राप्त होत नसल्यामुळे अर्जाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. त्यामुळे विशेषतः वृद्ध नागरिक, विधवा महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच निराधार लाभार्थ्यांना वारंवार कार्यालयीन फ ेऱ्या माराव्या लागत असून मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.

निवेदनात इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन / संजय गांधी निराधार योजना या सामाजिक सुरक्षा योजनांचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. शिरपूर तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी संबंधित ऑनलाइन वेबसाइट/पोर्टल सुरळीत व नियमित सुरू करावे, जढझ प्राप्त न होण्याची तांत्रिक अडचण तातडीने दूर करावी किंवा लाभार्थ्यांना होत असलेला त्रास लक्षात घेऊन जढझ ची अनिवार्यता रद्द अथवा शिथिल करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच यापूर्वी आवश्यक कागदपत्रांसह ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर केलेल्या पात्र लाभार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहू नयेत आणि त्यांना नियमानुसार लवकरात लवकर योजनेचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ हा खऱ्या अर्थाने गरजू व पात्र नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, तांत्रिक अडचणींमुळे कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनावर शिरपूर सरपंच सेवा महासंघ तालुकाध्यक्ष योगेंद्रसिंग सिसोदिया, सरपंच परिषद तालुकाध्यक्ष हेमंत सनेर, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, अहिल्यापूर सरपंच संग्रामसिंग राजपूत, वाठोडा सरपंच नारायण कोंडूसिंग चौधरी, नांथे सरपंच नेपाल राजपूत, हिंगोणी सरपंच सोमा भिल, खर्दे पाथर्डे सरपंच देविदास पाटील, सरपंच सेवा महासंघ तालुका संपर्क प्रमुख चंद्रकांत पाटील, कोषाध्यक्ष रोशन सोनवणे, उंटावद सरपंच राजकपूर मराठे, कुवे मा सरपंच दिलीप राजपूत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'ॐ नमो आदेश' च्या गजरात निमगाव फाट्यावर भंडारा उत्सवाची धूम

## पुंड परिवाराची परंपरा कायम; गोरक्षनाथ भंडारा उत्सवात, भाविकांची अलोट गर्दी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** नगर-कल्याण महामार्गावरील निमगाव वाघा फाटा (पुंड वस्ती) येथील श्री गोरक्षनाथ मंदिर चौथ्या श्रावणी सोमवारी भक्तीच्या रंगात रंगून गेले होते. सालाबादप्रमाणे यंदाही श्री गोरक्षनाथ भंडारा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

बाळासाहेब पुंड आणि समस्त पुंड परिवाराने या सोहळ्याचे आयोजन केले होते. पहाटेपासूनच मंदिर परिसरात स्वच्छता, फुलांची आकर्षक सजावट, रांगोळ्या आणि झगमगत्या रोषणाईने मंदिर उजळून निघाले होते. 'श्री गोरक्षनाथ प्रसन्न' आणि 'ॐ नमो आदेश' च्या अखंड जयघोषाने आसमंत दुमदुमला होता.

सकाळी बाळासाहेब पुंड यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात श्रींचा अभिषेक व विधिवत पूजा-अर्चा झाली. त्यानंतर सामुदायिक आरतीने वातावरण भारावून गेले.

यावेळी उद्योजक दिलीप दाते, माजी सरपंच अंबादास पुंड, माजी उपसरपंच फारुख सय्यद, रामदास फुले, मच्छिंद्र पुंड, कचरू पुंड, रवी पुंड, किरण पुंड, ग्रा.पं. सदस्य सोमनाथ पुंड, प्रा. भाऊसाहेब पुंड, योगेश वारुळे यांच्यासह समता परिषदेचे कार्यकर्ते व हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.

संध्याकाळी ५ ते ७ दरम्यान ह.भ.प. घनश्याम महाराज दळवी यांच्या सुश्राव्य कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. श्रावण महात्म्य आणि गोरक्षनाथ चरित्रावर त्यांनी भक्ती आणि सामाजिक प्रबोधनाचा सुरेख संगम घडवला.

कीर्तनानंतर झालेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने लाभ घेतला. श्रद्धा, सेवा आणि एकोप्याचे दर्शन घडवत उत्सवाची सांगता झाली.

# पावसाच्या खंडामुळे शेतकरी संकटात; विविध सामाजिक प्रश्नांवरही तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : राहीम कोक्कर**

**दि.०८, जिंतूर (परभणी) :** तालुक्यातील शेतकऱ्यांना पावसाच्या खंडामुळे मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत असून, शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिंतूर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

मागील २ महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक शेतकऱ्यांची पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतपिकांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली.याशिवाय मागील वर्षाचा तसेच चालू वर्षाचा पीक विमा तातडीने वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मोफत अन्नधान्य अथवा रेशन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

**सामाजिक प्रश्नांवरही काँग्रेस आक्रमक**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसोबतच निवेदनात विविध सामाजिक आणि कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित मुद्देही उपस्थित करण्यात आले. उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील १११ वर्षे जुनी मशीद पाडल्याच्या कथित घटनेचा काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आला. या प्रकरणात एका समाजाला जाणीवपूर्वक त्रास देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला असून, प्रकरणाची योग्य चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच दिल्ली येथे दोन महिला पत्रकारांना पोलिसांकडून धर्म विचारून मारहाण झाल्याच्या कथित घटनेचाही निवेदनातून तीव्र निषेध करण्यात आला. संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

**मागण्या तातडीने मान्य करण्याची मागणी**

वरील सर्व मागण्यांची तहसीलदारांनी शासनाकडे तातडीने पाठपुरावा करून शेतकरी व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते नागसेन भेरजे, तालुकाध्यक्ष केशव बुधवंत, शहराध्यक्ष सय्यद फेरोज, गटनेते शेख इस्माईल, नगरसेवक अकबर कुरैशी, नगरसेवक शेख माज, ॲड. माधव दाभाडे, दामू नवले पाटील यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'एफएफएस' प्रणाली शेतकरी व खत विक्रेत्यांसाठी ठरतेय डोकेदुखी

## रांगा कमी करण्यासाठी योजना आणली पण अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह...?

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** खत खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, शेतकऱ्यांची गर्दी कमी करणे आणि खतांचे योग्य नियोजन करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात सुरू करण्यात आलेली 'फार्मर फॉर फर्टिलायझर सेल' अर्थात एफएफएस ही मोबाईल ॲप आधारित प्रणाली सध्या खत विक्रेते आणि शेतकरी या दोघांसाठीही डोकेदुखी ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांचा त्रास कमी करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही प्रणाली प्रत्यक्षात मात्र तांत्रिक अडचणी, मोबाईल व इंटरनेटची मर्यादा आणि अतिरिक्त प्रक्रियेमुळे अधिक गुंतागुंतीची ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

● पूर्वी शेतकरी दुकानात आल्यानंतर आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खताची विक्री करणे शक्य होत होते. मात्र आता प्रत्येक विक्रीसाठी ऑनलाइन प्रक्रियेचे बंधन आल्याने विक्रेत्यांचा वेळ संगणक आणि मोबाईल प्रणाली हाताळण्यात जाणार आहे. ग्राहकांची गर्दी वाढल्यास एकीकडे खत वितरण आणि दुसरीकडे ऑनलाइन नोंदी अशी दुहेरी जबाबदारी विक्रेत्यांवर येणार आहे. शेतकऱ्याला प्रत्यक्ष खत उपलब्ध असूनही केवळ ॲपवरील प्रक्रिया पूर्ण होत नसल्यामुळे खत मिळाले नाही, तर ही व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताची कशी ठरेल, असा सवाल शेतकरी व विक्रेत्यांकडून उपस्थित केला जात आहे.

● शेतकऱ्यांना खताची गरज ही ठरावीक तारखेला नव्हे, तर पिकाच्या आवश्यकतेनुसार असते. त्यामुळे ठरावीक वेळ आणि टोकनच्या चौकटीत खत वितरण करणे अनेक वेळा व्यवहार्य ठरणार नाही, अशीही टीका होत आहे. एफएफएस प्रणालीमुळे खत वितरणात पारदर्शकता येण्याची शक्यता असली तरी त्याची अंमलबजावणी विक्रेते आणि शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरू नये, यासाठी शासनाने पर्यायी व्यवस्था ठेवण्याची मागणी होत आहे. एकंदरीत, 'रांगा कमी करण्यासाठी' सुरू करण्यात आलेली एफएफएस प्रणाली प्रत्यक्ष अंमलबजावणीत विक्रेत्यांसाठी डोकेदुखी आणि डिजिटल सुविधांपासून दूर असलेल्या शेतकऱ्यांसाठी नव्या त्रासाची भर ठरणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

एफएफएस प्रणालीअंतर्गत शेतकऱ्यांना खत खरेदी करण्यापूर्वी मोबाईलवरून आगाऊ मागणी नोंदवावी लागणार आहे. त्यासाठी फार्मर आयडी अथवा ई-केवायसीच्या माध्यमातून ओळख पडताळणी, जमिनीची माहिती, पिकाची नोंद, आवश्यक खताची निवड आणि विक्रेत्याची निवड अशा अनेक टप्प्यांतून जावे लागणार आहे. त्यानंतर मिळणाऱ्या क्यूआर कोड अथवा टोकननुसार ठरावीक वेळेत संबंधित विक्रेत्याकडून खताची खरेदी करता येणार आहे.

मात्र ग्रामीण भागातील अनेक शेतकरी अद्याप स्मार्टफोन, इंटरनेट आणि विविध मोबाईल ॲपच्या वापराबाबत पूर्णपणे सक्षम नसल्याने ही प्रणाली त्यांच्यासाठी त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. विशेषतः वयोवृद्ध शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी तसेच डिजिटल व्यवहाराचा अनुभव नसलेल्या शेतकऱ्यांना खताची मागणी नोंदविण्यासाठी इतरांची मदत घ्यावी लागणार आहे. त्यामुळे खतासाठी दुकानासमोर रांग लावण्याचा त्रास कमी झाला तरी आता मोबाईल सेंटर, संगणक चालक किंवा इतर व्यक्तीच्या मागे धावण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शेतकऱ्याने खत खरेदीसाठी प्रथम मोबाईलवर नोंदणी करणे, त्यानंतर जमिनीची व पिकाची माहिती भरून आवश्यक खताची मागणी करणे आणि उपलब्ध विक्रेत्याची निवड करणे आवश्यक आहे. मात्र जमीन नोंदीतील फेरफार, वारसाहक्क, सामायिक मालकी, भाडेतत्त्वावर शेती अथवा प्रत्यक्ष शेती करणाऱ्या व्यक्तीच्या नोंदीत तफावत असल्यास व मोबाईलवर तांत्रिक कारणामुळे संदेश पोहोचला नाही, तर शेतकऱ्याला अडचणीचा सामना करावा लागत आहे.

शेतीच्या हंगामात पिकाला तातडीने खताची आवश्यकता असताना ॲपवरील नोंदणी, पडताळणी आणि टोकन मिळण्याची प्रक्रिया वेळखाऊ ठरल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. पिकांच्या वाढीच्या विशिष्ट टप्प्यावर खत देणे आवश्यक असते. अशा वेळी तांत्रिक अडचणीमुळे खत मिळण्यास विलंब झाल्यास व मर्यादित खते मिळणार असल्याने त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होऊ शकतो. तसेच या प्रणालीमुळे खत विक्रेत्यांनाही मोठ्या प्रमाणात अतिरिक्त कामाचा भार सहन करावा लागणार आहे.

# शब्द नव्हे, कृती! बाबाजी पाटील यांच्या पाठपुराव्यातून प्रभाग २९ ला पाचवे आरोग्य केंद्र



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, शिळ फाटा (ठाणे) :** दिवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक २९ मधील खान कंपाउंड, दोस्ती व शिबली नगर परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. केवळ आश्वासन न देता, प्रत्यक्ष कृतीतून विकास साधणारे नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या अथक पाठपुराव्यामुळे ठाणे महानगरपालिका व महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून प्रभागातील पाचव्या आरोग्य केंद्राचा शुभारंभ आज दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

सुसज्ज लोखंडी केबिन स्वरूपात उभारण्यात आलेले हे आरोग्य केंद्र म्हणजे बाबाजी पाटील यांच्या जनसेवेच्या कार्याची पावती आहे. प्रभागातील गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना साध्या आजारासाठीही मैलोनमैल जावे लागत होते. ही अडचण ओळखून आपल्या लोकांना आरोग्यासाठी वणवण करावी लागू नये या एकाच ध्यासाने नगरसेवक बाबाजी पाटील यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आणि हे केंद्र मंजूर करून आणले.

**नागरिकांना होणारे फायदे :**

**१. उपचार घराजवळ :** खान कंपाउंड, दोस्ती, शिबली नगरमधील नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार.

**२. मोफत सेवा :** रक्तदाब, मधुमेह तपासणी, मोफत औषधे व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला.

**३. माता-बालकांसाठी वरदान :** लसीकरण व गरोदर मातांची तपासणी याच केंद्रात होणार.

**४. तात्काळ मदत :** आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचार त्वरित मिळणार.

यावेळी नगरसेवक बाबाजी पाटील यांच्यासह नगरसेविका वेदिका पाटील नगरसेविका अर्चना पाटील, विभाग प्रमुख गणेश मुंडे, विभाग संघटक वैभव आलिमकर, अन्वर कच्ची, आरिफ शेख, आरिफ खान, दोस्ती फाउंडेशनचे चेअरमन आरिफ शेख, आरोग्य केंद्राचे अधिकारी आणि संपूर्ण टीम, शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळी ढोकेश्वर परिसरात पोळा सणावर दुष्काळाचे सावट

## यंदा दुष्काळाच्या सावटाने साहित्य खरेदीत निरुत्साह

तांबा- पितळ या धातूच्या भावात वर्षभरात प्रचंड दरवाढ झाली आहे. यामुळे सर्जा - राजाच्या सजावटीसाठी लागणाऱ्या बैलांच्या गळ्यात घुंगरू माळा, पितळी पैंजण गोंडे, म्होरक्या, दावे, पायातील रंगीत गोंडे, आकर्षक रंगसंगतीच्या झुली, रिबीन या वस्तूंचे विविध प्रकार उपलब्ध आहेत. मात्र यंदा साहित्याच्या दरात १० ते १५ टक्के प्रत्येक दरवाढ झाल्याने शेतकरी हात राखूनच खर्च करत आहे. दरवर्षीपेक्षा यावर्षी व्यवसाय कमी होण्याची शक्यता आहे.

**- प्रमोद बागले (सजावट वस्तू विक्रेता दुकानदार)**

गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारली आहे. यामुळे खरीप हंगामावर दुष्काळाचे सावट पसरले आहे. तालुक्यातील शेतकरी या भयानक परिस्थितीला सामोरे जात आहे. रितीरिवाज, परंपरा म्हणून सण - उत्सव साजरे करावे लागत आहे. शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला पोळ सणही आता ऋण काढून साजरा करण्याची वेळ आली आहे.

**- अशोक पाटील (प्रगतशील शेतकरी, टाकळी ढोकेश्वर)**



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** बळीराजाच्या सोबतीने वर्षभर काळ्या मातीत राबणाऱ्या सर्जा - राजा प्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैल पोळा हा सण येत्या गुरुवारी साजरा होत आहे. मात्र, या सणावर दुष्काळ व महागाईचे सावट पसरल्याने शेतकऱ्यांना हात राखूनच आपल्या लाडक्या बैलजोडीसाठी साज - शृंगारांचे साहित्य खरेदी करावे लागत आहे.

टाकळी ढोकेश्वरमध्ये बैलांना सजवण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांनी दुकाने सजली आहेत. बैल पोळा दोन दिवसांवर आला आहे. सध्या खरेदीसाठी अद्याप म्हणावा तसा शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने बाजारपेठेत अद्याप शुकशुकाट जाणवत आहे. बैल सजावटीच्या साहित्यात यावर्षी तब्बल १० ते १५ टक्के झालेली वाढ शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी ठरली आहे.

यंदा दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. मात्र तरीही पाळीव जनावरांना सजविण्यासाठी शेतकरी आवर्जून अडचणी दूर सारून बैल पोळा सण साजरा करतात हा आज पर्यंतचा अनुभव आहे.

सजावटीच्या सामानाच्या खरेदीसाठी पळशी, वासुंदे, वनकुटे, वडगाव सावताळ, कासारे, पळसपुर, सावरगाव, कर्जुले हार्या, ढोकी, तिखोल, काकणेवडी, भोंद्रे, नांदुर पठार,पोखरी आदी भागातील शेतकऱ्यांना टाकळी ढोकेश्वरची बाजारपेठ सोयीची आहे. सध्या यांत्रिक पद्धतीने शेती करण्याचा कल वाढला आहे. ट्रॅक्टर, यांत्रिक औजारे यांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतीत वाढला आहे. त्यामुळे बैलगाडी बैलजोड्यांची संख्या कमी होत आहे.

याचा परिणाम खरेदीवर परिणाम जाणवतो असे सजावट साहित्य दुकानदारांचे म्हणणे आहे. सामानाच्या वस्तूंमध्ये भाव वाढ झाली असली तरीही अशाही परिस्थितीत अनेक भागात बैलजोड्या, गायी, म्हशी यांच्या भव्य मिरवणुका पारंपरिक वाद्यांच्या गजरात काढल्या जातात. परंतु आता अर्धा सप्टेंबर महिना होऊनही एकही समाधानकारक पाऊस पडला नाही. याचा मोठा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसला आहे.

## थोडक्यात बातम्या

### महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते दिवा प्रभाग समितीच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८,दिवा (ठाणे) :** महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीच्या सभापतीपदी नगरसेवक दीपक जाधव विराजमान झाले आहेत.

नवनिर्वाचित सभापती दीपक जाधव यांच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन ठाणे महापालिकेच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी ठाणे महानगरपालिकेची महापौर शर्मिला पिंपळोलकर,माजी उपमहापौर तथा शिवसेनेचे दिवा शहरप्रमुख, नगरसेवक तथा दिवा शहर अध्यक्ष रमाकांत मढवी यांच्यासह नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेवक शैलेश पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, नगरसेविका वेदिका पाटील, नगरसेवक आदेश भगत, साक्षी मढवी तसेच दिवा प्रभागातील प्रभाग २७, २८ व २९ मधील सर्व नगरसेवक, सहाय्यक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे व मोठ्या संख्येने पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सभापती दीपक जाधव यांनी पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत नागरी सुविधांचे प्रश्न प्राधान्याने सोडवून दिवा शहराच्या विकासाला गती देण्याचा संकल्प व्यक्त केला.

# मिरा-भाईंदरमधील बेकायदेशीर बांधकामांवर परिवहन मंत्री सरनाईक 'नायक' शैलीत आक्रमक

## नगररचना विभागाच्या भ्रष्ट कारभारावर सोडले आसूड; दोषींवर गुन्हे दाखल करण्याची जोरदार मागणी

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरातील फोफावलेले बेकायदेशीर बांधकामे आणि महापालिकेच्या नगररचना (टाऊन प्लॅनिंग) विभागाच्या संशयास्पद कारभाराविरोधात आणि पालिका प्रशासनावर दबाव टाकून नियमबाह्य पद्धतीने नकाशे मंजूर करून देण्याच्या मोबदल्यात विकासकांना भागीदारी दिली जाते अशी तक्रार काही लोकांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री आणि मिरा-भाईंदर लोकप्रतिनिधी प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्याकडे केली होती. याच संदर्भात आज तक्रारींची चौकशी आणि दखल घेण्याकरिता अधिकृतरित्या थेट 'नायक' स्टाईलमध्ये आक्रमक पवित्रा घेत मिरा-भाईंदर महानगरपालिका नगर रचना विभागात मंत्री प्रताप सरनाईक यांनी पाहणी दौरा केला. नियमबाह्य प्रकरणांवर कारवाई न करता मूग गिळून बसलेल्या पालिका प्रशासनाला आणि विकासकांना पाठीशी घालणाऱ्या राजकीय व्यवस्थेला मंत्री सरनाईक यांनी थेट इशारा दिला आहे. सर्वसामान्यांना प्रत्येक कामासाठी न्यायालयात धाव घ्यावी लागत असेल, तर प्रशासकीय यंत्रणा काय झोपा काढतेय का? असा सवाल करत त्यांनी या प्रकरणातील दोषी वास्तुविशारद, मालक आणि बिल्डरांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची आग्रही मागणी केली आहे.

**काय आहे नेमके संपूर्ण प्रकरण?**

Special Civil Suit No. ४८१/२०१४ प्रकरणी मा. न्यायालयाने ०४ मार्च २०२४ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिकेला विवादित जागेवर `WmpñWVr' (Status Quo) स्थिती ठेवण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. महानगरपालिका स्वतः या प्रकरणात पक्षकार असतानाही नगर रचना विभागाने कोर्टाच्या आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. कोर्टाचा आदेश अस्तित्वात असताना २०२६ मध्ये जीएन कन्स्ट्रक्शन, स्टोनवॉल बिल्डकॉन एलएलपी आणि आमदार नरेंद्र मेहता यांच्यासह 'सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा. लि.' कंपनीशी संबंधित अनेक संस्थापक या अशा कंपन्यांमध्ये भागीदार असून त्यांच्यामार्फत नियमबाह्य पद्धतीने ३३ मजल्यांपर्यंतच्या इमारतींसाठी सीसी आणि सुधारित परवानग्या निर्गमित करण्यात आल्या. तेच सदर मौजे नवघर येथील जमिनींबाबत चंदनशांती ग्रुप आणि मूळ मालकांनी हरकती नोंदवलेल्या असताना आणि कोर्टाचा हुकूमनामा असतानाही महानगरपालिकेने नियमबाह्य सहकार्य केले. या प्रकरणात तब्बल १५० ते २५० कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांची आणि सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सहभागाची माहिती समोर आली आहे.



**वास्तुविशारदाची सनद कायम स्पवरूपी रद्द करून चुकीची माहिती सादर केल्या प्रकरणी विकासकांवर देखील गुन्हे दाखल करा - मंत्री सरनाईकांची मागणी**

मिरा-भाईंदरमधील कथित बेकायदेशीर बांधकाम प्रकरणात 'सेव्हन इलेव्हन' कंपनीसह अनेक मोठ्या विकासकांचे साटेलोटे असल्याचे समोर आले आहे. नियमबाह्य कामांना बळ देणाऱ्या संबंधित वास्तुविशारदाची (आर्किटेक्ट) सनद कायमस्वरूपी रद्द करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याचे आणि संबंधित विकासकांवर चुकीची माहिती देऊन प्रतिज्ञापत्र सादर केल्याबद्दल त्यांच्यावर देखील गुन्हे दाखल करण्याचे आणि दिलेली सीसी कायमची रद्द करण्याचे निर्देश मिरा-भाईंदरचे पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांना केले असून या प्रकरणाचे अधिकृत कागदपत्रे व पुराव्यांची फाईल मंत्री सरनाईक यांनी उपायुक्त राहुल चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केली. आर्थिक व्यवहार आणि घोटाळ्याची व्यापक चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**आमदार मोठा की कायदा? - आमदार नरेंद्र मेहतांवर थेट हल्लाबोल**

प्रसारमाध्यमांशी बोलताना मंत्री सरनाईक यांनी भाजप आमदार नरेंद्र मेहता यांच्यावर टीकेची झोड उठवली. मिरा-भाईंदरमधील जमिनींचे गैरव्यवहार, आदिवासी व भूमिपुत्रांच्या जमिनी बळकावणे आणि बेकायदेशीर बांधकामांमध्ये प्रत्येक वेळी मेहता किंवा त्यांच्या निकटवर्तीयांचेच नाव का येते, असा परखड सवाल त्यांनी केला.

**पक्षाच्या प्रतिमेपेक्षा जनतेचा न्याय महत्त्वाचा; उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

या प्रकरणाचा संबंध १४६ विधानसभा मतदारसंघाशी असल्याने एकाही दोषीला सोडले जाणार नाही. बेकायदेशीर बांधकामांसाठी कोट्यवधी रुपयांची रोकड कुठून आली, अधिकारी आणि बिल्डरांची अभद्र युती कशी जमली, याचे सर्व धागेदोर शोधण्यासाठी ही चौकशी केवळ १-२ अधिकाऱ्यांपुरती मर्यादित न ठेवता उच्चस्तरीय एसआयटी मार्फत झाली पाहिजे.

या प्रकरणासंदर्भात बोलताना मंत्री सरनाईक म्हणतात कि, मिरा-भाईंदर ही काय कोणाची खाजगी मालमत्ता आहे का? एखाद्या लोकप्रतिनिधीच्या दबावापोटी पालिका प्रशासन बेकायदेशीर मंजुरी देणार असेल, तर 'आमदार मोठा की कायदा?' हा उच्च न्यायालयाने विचारलेला प्रश्न आज संपूर्ण शहराला पडला आहे. गेल्या १७ वर्षांच्या माझ्या आमदारकीच्या कार्यकाळात मी कधीही नियमबाह्य कामासाठी प्रशासनावर दबाव आणलेला नाही. स्थानिक नेत्याच्या स्वार्थी कारभारामुळे सत्ताधारी महायुती सरकार आणि भाजपची प्रतिमा मलिन होत आहे. जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवून मतदान करते, त्यामुळे पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने या स्थानिक मनमानीची गंभीर दखल घेतली पाहिजे. जनतेवर अन्याय होत असेल आणि भ्रष्टाचाराचे साम्राज्य उभे राहत असेल, तर मी गप्प बसणार नाही. या प्रकरणातील महापालिका अधिकाऱ्यांवर शासनाच्या स्तरावर योग्य ती कारवाई केली जाईल. मात्र, पोलिसांनी संबंधित वास्तुविशारदाची कागदपत्रे आणि परवाना तपासून, नियमबाह्य प्रकार आढळल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी, तसेच बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या मालकांवरही गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी राज्याचा मंत्री म्हणून मी करत असून प्रत्येक प्रकरणात जर नरेंद्र मेहता आणि त्यांच्या 'सेव्हन इलेव्हन' कंपनीचे नाव येत असेल, तर मिरा-भाईंदर ही त्यांची स्वतःची मालमत्ता आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. या सर्व प्रकरणांकडे वरिष्ठ पातळीवर गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# ज्ञानदानाला सलाम! सावर्डेत लायन्स क्लबकडून गुरुजनांचा भव्य गौरव

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०८, सावर्डे (चिपळूण) :** विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी लायन्स क्लब ऑफ सावर्डे आयडियल तर्फे शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

५ सप्टेंबर १८८८ रोजी जन्मलेल्या डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी आपल्या अगाध बुद्धिमत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर भारतीय तत्त्वज्ञानाचा ठसा उमटवला. ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापकपदापासून ते भारताचे सोव्हिएत युनियनमधील राजदूत, पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती म्हणून त्यांनी देशसेवा केली. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाचा आदर करण्यासाठी त्यांचा जन्मदिवस (५ सप्टेंबर) संपूर्ण भारतात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो.

या औचित्याने ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची अमूल्य शिदोरी देणाऱ्या आदरणीय शिक्षकांचा विशेष सन्मान सोहळा नुकताच रविवार दि. ०७ सप्टेंबर २०२६ रोजी, हॉटेल रिवाज, सावर्डे येथे संपन्न झाला.



या सोहळ्या प्रसंगी रविंद्र घाणेकर सर, चित्रा कानडे मॅडम, अश्विनी पाटील मॅडम, मीरा मॅडम, प्राची मॅडम आणि शिगवण गुरुजी यांचा विशेष सन्मान करून त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला लायन डॉ. रश्मी पाटील, लायन डॉ. वर्षा खानविलकर, लायन डॉ. निलेश पाटील, लायन डॉ. अजित गावकर, लायन प्राची गोखले, लायन मीरा पाध्ये, लायन राधिका शिंदे, लायन ऋतुजा देवळेकर आणि लायन अनंत शिगवण गुरुजी उपस्थित होते.

शिक्षक हा केवळ ज्ञान देत नाही, तर आयुष्याला योग्य दिशा देतो. या जाणीवेतून शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणे ही आपली सामाजिक जबाबदारी असून सेवेच्या माध्यमातून समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणाऱ्या लायन्स क्लब सावर्डे आयडियल संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमाचे विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# गळीत धान्य अंतर्गत सोयाबीन पिकाचे शेतकरी प्रशिक्षण



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०८, उदगीर (लातुर) :** गुडसूर येथे कृषी विभागामार्फत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत सोयाबीन पिकाचे शेतकरी प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी प्रमुख मार्गदर्शक शास्त्रज्ञ म्हणून सुरेश नवले प्राध्यापक डोंगरशेळकी कृषी महाविद्यालय तसेच तालुका कृषी अधिकारी कार्यालय उदगीर च्या वतीने उपकृषी अधिकारी फारुख शेख व सहाय्यक कृषी अधिकारी संतोष गुंडरे तसेच गुडसूर गावचे सहाय्यक कृषी अधिकारी दर्शन केंद्रे हे प्रामुख्याने उपस्थित होते.

श्री.नवले यांनी सोयाबीन पिकावरील यलो मोजाइक तसेच ऊस पिकावरील पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव व गांडूळ खत निर्मिती याबाबत सखोल असे मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना केले. त्यानंतर श्री. शेख यांनी कृषी विभागाच्या सर्व योजनांचे अत्यंत सविस्तरपणे मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना केले. त्यानंतर श्री. केंद्रे यांनी शेतकऱ्यांना रासायनिक खते- जसे की युरिया, डीएपी, सुपर इत्यादी सर्व प्रकारच्या खतांची ऑनलाईन पद्धतीने नोंदणी कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणासाठी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.